# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
## जवाहर बालभवन, नेताजी सुभाष रोड,
## चर्नीरोड, मुंबई ४०० ००४

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या समन्वयाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व प्राथमिक शिक्षण वृध्दीकरणाच्या कार्यक्रम अंमलबजावणीसाठी युनिसेफने (मुंबई) हंगामी स्वरुपात मंजूर केलेल्या खाली नमूद केलेल्या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | पदनाम, मुख्यालय व एकूण मासिक पारिश्रमिक | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १. | मुख्य सल्लागार (शै.गु.) रु.३५,०००/- एकूण मासिक पारिश्रमिक मुख्यालय मुंबई किंवा पुणे. | १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.ए./एम.एस.सी.+ एम.एड. किंवा बी.एड. किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण<br>२. प्राथमिक शिक्षण क्षेत्रात कामाचा किमान १० वर्षाचा अनुभव,<br>३. शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी विशेष व वैशिष्टयपूर्ण काम केलेल्यांना व यापुढेही तळमळीने काम करु इच्छिणाऱ्यांना प्राधान्य.<br>४. संगणकाचे चांगले ज्ञान असणे आवश्यक तसेच संगणकावर मराठी टंकलेखनही अवगत असल्यास अधिक उपयुक्त होईल. |
| २. | सल्लागार रु.३०,०००/- एकूण मासिक पारिश्रमिक मुख्यालय मुंबई किंवा पुणे. | ३ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.ए./एम.एससी + एम.एड. किंवा बी.एड किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण<br>२. प्राथमिक/माध्यमिक शिक्षण क्षेत्रात काम केल्याचा किमान ७ वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>३. अध्यापक विद्यालय/ अध्यापक महाविद्यालयात किमान ५ वर्षाचा अध्यापन/प्रशिक्षणाचा अनुभव.<br>४. शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी विशेष कामगिरी केलेल्यांना व तळमळीने काम करु इच्छिणाऱ्यांना प्राधान्य.<br>५. संगणकाचे चांगले ज्ञान असणे आवश्यक तसेच संगणकावर मराठी टंकलेखनही अवगत असल्यास अधिक उपयुक्त होईल. |

**वयोमर्यादा -** अ.क्र.१ व २ येथे नमूद केलेल्या पदांसाठी वयोमर्यादा जाहिरातीच्या दिनांकास ५० वर्षे पर्यंत राहील.

**प्रतिनियुक्ती -** प्रतिनियुक्तीने नियुक्तीस योग्य उमेदवार मिळाल्यास त्यांचाही विचार करण्यात येईल. सेवेत असणाऱ्यांनी योग्य माध्यमातून (त्यांच्या कार्यालयामार्फत) अर्ज सादर करावेत.

**नियुक्तीचे स्वरुप -** करार पध्दतीने ६ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती राहील. प्रतिनियुक्तीने असल्यास सुरूवातीस एक वर्षासाठी राहील. त्यांचा करार कालावधी/प्रतिनियुक्ती कालावधी युनिसेफने पदांना मुदतवाढ दिल्यास व संबधिताचे काम समाधानकारक असल्यास वेळोवेळी वाढविण्यात येईल.

**कार्यक्षेत्र :** संपूर्ण महाराष्ट्र राज्य. **मुख्यालय :** मुंबई किंवा पुणे बाबत लवचिक धोरण राहील.

**निवड प्रक्रीया :** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयात कार्य करीत असताना लागणाऱ्या व्यक्तिमत्त्वातील गुणवत्ता व कौशल्याबाबत लेखी (पेपर पेन्सिल/संगणक) चाचणी किंवा / व तोंडी चाचणी घेण्यात येईल.

अर्जदारांनी संपूर्ण तपशिलासह (पूर्व नाव, पत्ता, जन्मतारीख, प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता, अनुभव, शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी विशेष काम केले असल्यास तपशील व प्रमाणपत्राच्या प्रती इ.) राज्य प्रकल्प संचालक यांच्या नावे वरील पत्त्यावर दि. ०७/०८/२०१० कार्यालयीन वेळेपर्यंत अर्ज सादर करावेत. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जाहिरात या कार्यालयाच्या वेबसाईट www.mpsp.org.in या संकेत स्थळावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**सही/-**
**राज्य प्रकल्प संचालक**
**मप्राशिप, मुंबई**

**दिनांक : १६.७.२०१०**